**नियमीत दिवाणी दावा नं.५०६/२०१२ मधील नि.६८ खालील आदेश**
**CNR : MHSN06003181-2017**
**(धोंडिराम रायाप्पा बंडगर वि. शशिकांत सिद्राप्पा बंडगर आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द साठेखत करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र करुन मिळणेसाठी व हक्क स्थापनेसाठी दाखल केलेला आहे. सदर दावेकामी वादी यांनी प्रतिवादी क्र.०२ यांचे वारस अभिलेखावर घेणेत आले होते. परंतु २/१ यांचे नाव सावित्री अनिल बंडगर असे नजरचुकीने नमूद झालेले आहे. सबब सदरचे नाव सावूबाई अनिल बंडगर असे असून सदर नावाची दुरुस्ती करणेस परवानगी असावी अशी विनंती करतात.

**०२.** सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जावरच म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. अर्जातील कारण नमूद नसलेने सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती करतात.

**०३.** सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द साठेखत करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र करुन मिळणेसाठी व हक्क स्थापनेसाठी दाखल केलेला आहे. सदर दावेकामी वादी यांनी प्रतिवादी क्र.०२ यांचे वारस अभिलेखावर घेणेत आले होते. परंतु २/१ यांचे नाव सावित्री अनिल बंडगर असे नजरचुकीने नमूद झालेले दिसून येत आहे. सदरचे नाव सावूबाई अनिल बंडगर असे असून सदर नावाची दुरुस्ती करणेस परवानगी असावी अशी विनंती केली आहे. दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. तरी सदर दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायाचीत वाटते. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**०१.** वादींचा नि. क्र. ६८ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादी यांनी सदर दुरुस्ती आज पासून १४ दिवसाच्या आत नि.क्र.०१ वर दुरुस्ती करुन पुढील कायदेशीर पूर्तता करावी.

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Date: 2023.09.29 16:24:08 +0530

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.२९/०९/२०२३ तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 29/09/2023 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 29/09/2023 |
| **Order uploaded on** | **:** | **29/09/2023** |